# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
Email ID : education.nmc@gmail.com

जा.क्र. शि.वि./319/2014
दि. 16/8/2014

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

.................................................. प्राथ. / उच्च प्राथ. / माध्य. शाळा,

म.न.पा. नागपूर

**विषय :– माझी शाळा हा मराठी चित्रपट राज्यातील शाळामधून दाखविण्यास परवानगी देणेबाबत.**

**संदर्भ :– 1) मा. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पूणे यांचे पत्र क्र. शिसं / व्हीसीडी / 2013 / 163 विद्या शाखा, दिनांक 13.01.2014.**

**2) संचालक, राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था, पूणे यांचे पत्र क्र. राशैतंसं / आस्था / मा.शा. / चिपअ / 2013–14 / 577, दिनांक 19 / 10 / 2013.**

उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये माझी शाळा हा मराठी चित्रपट राज्यातील शाळांमधून विद्यार्थ्यांना दाखविण्यात यावे. खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून शैक्षणिक वर्ष सन् 2014–15 व सन् 2015–16 या दोन वर्षापुरती परवानगी देण्यात येत आहे.

अटी :–

1) सदर चित्रपट पाहण्याची कोणत्याही विद्यार्थ्यांना सक्ती करण्यात येणार नाही.
2) सदरहू चित्रपट पाहण्यासाठी रू. 10 (रूपये दहा फक्त) पेक्षा अधिक मुल्य आकारले जाणार नाही.
3) हा चित्रपट शाळांमधून कोणत्याही प्रकारचा वाद उद्‌भवल्यास किंवा तक्रारी प्राप्त झाल्यास सदर संस्थेस दिलेली परवानगी तात्काळ रद्द करण्यात येईल.
4) या शासन परवानगीच्या आधारे सदर चिपट दाखविण्याबाबत श्री. विनोद तांबे, निर्माता फॅशन वर्ल्ड एंटरटेनमेंट यांना इतर दुसऱ्या कोणत्याही संस्थेसोबत करार करता येणार नाही, किंवा प्रतिनिधी नेता येणार नाही व तशी परवानगी त्यांना राहणार नाही.

ज्या निर्मात्याकडे या चित्रपटाचे मूळ परिपत्रक आहे. त्या निर्मात्यास सदर चित्रपट दाखविण्यास परवानगी द्यावी. शाळेमध्ये प्रत्यक्ष चित्रपट दाखवितांना मूळ परिपत्रक व परवानगी याबाबतची खात्री मुख्याध्यापक यांनी करावी.

**शिक्षणाधिकारी**
नागपूर महानगरपालिका, नागपूर